# प्रेसनोट

दिनांक : २१.०४.२०२०

१) नोव्हेल कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत समाविष्ट न झालेल्या केशरी शिधापत्रिकाधारकांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रुपये ५९००० पेक्षा जास्त व रूपये १ लाखापर्यंत असणा-या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना गहू रू.८/- प्रति किलो व तांदूळ रू.१२/- प्रति किलो या दराने प्रति माह प्रतिव्यक्ती ३ किलो गहू व २ किलो तांदूळ याप्रमाणे ५ किलो अन्नधान्याचे मे महिन्याचे वितरण दिनांक २४.४.२०२० पासून सुरू करण्यात येणार आहे.

२) दिनांक १.४.२०२० पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील (NFSA) प्राधान्य कुटुंब लाभार्थी व अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना माहे एप्रिल महिन्याचे नियमित अन्नधान्याचे वितरण करण्यात येत असून आतापर्यंत तांदूळ **१३७५४** मेट्रिक टन आणि गहू **२०००५** मेट्रिक टन इतक्या अन्नधान्याचे **९०%** शिधापत्रिकाधारकांना वितरण पूर्ण करण्यात आले आहे.

३) प्रधानमंत्री गरीब कल्याण योजने अंतर्गत दिनांक १२.४.२०२० पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील (NFSA) प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी व अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना नियमित अन्नधान्याच्या वितरणानंतर प्रति माणसी ५ किलो मोफत तांदळाचे वितरण करण्यात येत असून आतापर्यंत **६९ %** शिधापत्रिकाधारकांना एकुण **२५३६०** मेट्रिक टन इतक्या मोफत तांदळाचे वितरण करण्यात आले आहे.

४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील (NFSA) सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांनी त्यांना शासनाकडून देय असलेल्या अन्नधान्याच्या तपशीलाबाबत शासनाच्या http://mahaepos.gov.in या वेबसाइट वरील RC Details मध्ये जाऊन शिधापत्रिकाधारकांना त्यांचे शिधापत्रिकेकरीता देण्यात आलेल्या १२ अंकी SRC Number टाकून खातरजमा करावी . जर अधिकृत शिधावाटप दुकानदाराने त्यानुसार अन्नधान्य न दिल्यास त्याच्याविरूध्द कडक कार्यवाही करण्यात येईल.

५) राष्ट्रीय अन्नसुरक्षा (NFSA) योजनेअंतर्गत सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांना शासन परिमाण आणि दरानूसार देय असलेल्या अन्नधान्य वितरणामध्ये गैरप्रकार होऊ नये याची दक्षता घेण्याकरीता हे कार्यालय आणि अधिनस्त ५ परिमंडळ कार्यालयीन स्तरावर एकूण **४४** दक्षता पथके गठित करण्यात आली आहेत.सदर पथकामार्फत दिनांक **२१.४.२०२०** रोजी पर्यंत एकुण **४२६३** अधिकृत शिधावाटप दुकानांना भेटी देण्यात आल्या आहेत.त्याच प्रमाणे आता पर्यंत ५ परिमंडळ कार्यक्षेत्रातील अधिनस्त असलेल्या एकूण **०७** अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी अन्नधान्य वितरणात केलेल्या गैरप्रकारा बद्दल त्यांचे विरूध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत कारवाई करुन गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

६) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील (NFSA) शिधापत्रिकाधारकांनी स्वत:हून त्यांचे धान्य सोशल डिस्टन्सिंगचा वापर करुन तसेच मास्कचा वापर करुन प्राप्त करुन घ्यावे.त्यासाठी अधिकृत शिधावाटप दुकान सकाळी ८.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत उघडी राहतील.

७) अन्नधान्या पासून राष्ट्रीयअन्नसुरक्षा योजनेतील(NFSA) एकही शिधापत्रिकाधारक वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना सर्वांना देण्यातआलेल्याआहेत.तसेच अन्नधान्याचा मुबलक साठा उपलब्ध असल्यामुळे कोणीही अधिकृत शिधावाटप दुकाना समोर गर्दी करु नये.असे आवाहन याव्दारे करण्यात येत आहे.

( कैलास पगारे,भा.प्र.से )
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा
मुंबई

Scanned with CamScanner